**स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१०, E Mail - pilcbnskr@gmail.com


# प्रेसनोट

दिनांक :- ०६/०७/२०१८

## ऋषदेवपुरम्-मांगीतुंगी गडावर मा.पोलीस अधीक्षक सो यांचे हस्ते पोलीस चौकीचे उद्घाटन

ऋषभदेवपुरम्-मांगीतुंगी, ता.सटाणा येथे दिनांक ०५ जुलै २०१८ रोजी नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो**. यांचे शुभहस्ते नवीन **पोलीस चौकीचे उद्घाटन** करण्यात आले. कार्यक्रम प्रसंगी अपर पोलीस अधीक्षक मालेगाव श्री. हर्ष पोद्दार सो, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. शशिकांत शिंदे, सहा.पोलीस निरीक्षक जायखेडा श्री. सतिष गावीत यांचेसह विभागातील पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. मांगीतुंगी गडावरील १०८ फुट भगवान ऋषभदेव प्रतिमा निर्माणच्या प्रेरणास्त्रोत भारतगौरव श्री. ज्ञानमती माताजी, प्रज्ञाश्रमणी श्री. चंदनामती माताजी यांचे प्रमुख उपस्थितीत दिगम्बर जैन मुर्ति निर्माण कमिटी तसेच ट्रस्टचे अध्यक्ष व कार्यकारीणी कार्यक्रमास उपस्थित होते, तसेच दसवेल गावचे सरपंच श्री. रविंद्र सोनवणे, व भिलवाड गावचे सरपंच श्री. बाळु पवार यांचेसह बागलाण तालुक्यातील गावकरी मोठया प्रमाणात उद्घाटन सोहळयास उपस्थित होते.

उद्घाटन सोहळयानंतर मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो. यांनी मनोगत व्यक्त केले. मांगीतुंगी गडावरील १०८ फुट विशालकाय भगवान ऋषभदेवांची प्रतिमा निर्माण कमिटीची प्रशंसा करून उपस्थितांचे आभार मानले. मांगीतुंगी क्षेत्रावर दर्शनासाठी येणारे भाविक तसेच स्थानिक नागरीकांचे सुरक्षिततेची जबाबदारी पोलीस प्रशासनव्दारे सत्वर पार पाडली जाईल असे आश्वासन मा.पोलीस अधीक्षकांनी दिले. तसेच मांगीतुंगी गडावरील पोलीस चौकीवर जायखेडा पोलीस ठाणेकडील अधिकारी व कर्मचारी नियमित उपस्थित राहुन सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य तो बंदोबस्त करणार आहे.

दरम्यान भगवान ऋषभदेव प्रतिमा निर्मिती कमिटीचे पदाधिकारी यांनी मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो. व त्यांच्या पत्नी श्रीमती रोहिणी दराडे यांचे सहर्ष स्वागत केले. त्यानंतर उपस्थित पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी मांगीतुंगी गडावर १०८ फुट विशालकाय भगवान ऋषभदेवांचे प्रतिमेचे दर्शन घेतले व कार्यक्रमाची सांगता झाली.